लोकमत



# शहाद्यात ६३ जणांचे रक्तदान

शहादा : शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रक्तदान शिबिर घेण्यात आले. यात ६३ जणांनी रक्तदान केले. या आधी भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन मोतीलाल फकिरा पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी उपाध्यक्ष जयदेव पाटील, सचिव विलास पाटील, जिल्हा परिषद सदस्य अभिजित पाटील, एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील उपस्थित होते.

प्रा.ए.के. पटेल, प्रा.भूषण निकम, राष्ट्रीय सेवायोजना कार्यक्रम अधिकारी प्रा.नयना कुलकर्णी आदींनी नियोजन केले. (वार्ताहर)

आपला महाराष्ट्र दि. ५ ऑक्टों २०१३
(मंगळवार)

## विज्ञान महाविद्यालयात रक्तदान, ज्ये.ना.दिवस

शहादा (का.प्र.):येथील श.ता.को.ऑप.एज्यु. सोसा.संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रक्तदान व ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानार्थ ज्येष्ठ नागरिक दिवसाचे आयोजन करण्यात आले. शहादा येथील वैद्यकिय क्षेत्रातील गाढे अभ्यासक डॉ.आदिनाथ वैद्य यांनी रक्तदान करणे श्रेष्ठत्वाचे लक्षण आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी कशा पध्दतीने त्यांना मान सन्मान द्यावा, म्हातारपणी त्यांची काठी बनून त्याचा सहारा बनावे असे मार्गदर्शन केले. शासन ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करते. ही बाब सन्मानाची आहे असे सांगितले. सुत्रसंचालन रासेयो स्वयंसेवक प्रमोद सोनवणे तर आभार प्रदर्शन प्रियंका बाबिस्कर ह्या विद्यार्थीनीने केले. कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक प्रा.भूषण निकम यांनी केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी नयना कुलकर्णी, प्राचार्य डॉ.आर.डी.पाटील, प्रा.ए.के.पटेल उपस्थित होते.

सकाळ ५ फेब्रु २०१८ (रविवार)



शहादा : विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात आयोजित रक्तदान शिबिराप्रसंगी उपस्थित संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, प्रा. भूषण निकम, प्रा. सोनाली पाटील, प्रा. हर्शल खैरनार, प्रा. सविता पाटील आदी.

# विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात रक्तदान शिबिर

बामखेडा, ता. ६ : येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रक्तदान शिबिर नुकतेच घेण्यात आले. यात ४० दात्यांनी रक्तदान केले. संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. संस्थेचे मानद सचिव ए. के. पटेल, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. भूषण निकम, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. सोनाली पाटील, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. हर्शल खैरनार, प्रा. सविता पाटील उपस्थित होते.

# विज्ञान महाविद्यालयात ८० दात्यांचे रक्तदान



शहादा येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात आयोजित रक्तदान शिबिरप्रसंगी उपस्थित मोतीलाल पाटील, ए.के. पटेल, प्रा.हर्षल खैरनार, प्रा.सोनाली पाटील, प्रा.सविता पाटील व विद्यार्थी.

शहादा : विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित रक्तदान शिबिरात ८० दात्यांनी रक्तदान केले.

संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या या शिबिरात रासेयोचे स्वयंसेवक, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. शिबिराचे उद्घाटन मोतीलाल पाटील यांच्या हस्ते झाले. धुळे येथील नवजीवन ब्लड बँकेच्या शिबिरासाठी सहकार्य मिळाले. शिबिराचे आयोजन संस्थेचे मानद सचिव ए.के. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम, प्रा.सोनाली पाटील, प्रा.हर्षल खैरनार, प्रा.सविता पाटील यांनी केले. (वार्ताहर)

लोकमत ६ फेब्रु २०१८ (मंगळवार)